# माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा

## फेब्रुवारी 2006

प्रश्नपत्रिका कोड क्रमांक

| 0 | 1 | 1 | 1 |
|---|---|---|---|

## भाषा (मराठी)

**एकूण गुण - 100** **वेळ : 11.00 ते 12.00**

***सर्वसामान्य सूचना :—***

*(1) खाडाखोड केलेली अगर गिरवलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

*(2) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग असून, विभाग 1 साठी 20 गुण व विभाग 2 साठी **80** गुण आहेत.*

### विभाग 1

### (गुण — 20)

***सूचना :—(1) प्रश्नक्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

1. खालील विषयावर 10 ओळी निबंध लिहा. त्यासाठी खाली दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा—

   *'लोखंडी नांगराचे आत्मवृत्त'.*

   (मुद्दे : जन्मकथा, फायदे, नवीन रूप, स्पष्टीकरण)

2. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 10 ओळीत कल्पनाविस्तार करा.

   *"टाकीचे घाव सोसल्याविना देवपण येत नाही."*

   (मुद्दे : उक्तीचा अर्थ, उदाहरणे, स्पष्टीकरण)

## विभाग 2

## (गुण — 80)

*सूचना :—(1) या विभागातील उत्तरे उत्तरपत्रिकेच्या विभाग 2 मध्येच लिहा.*

*(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 2 गुण आहेत.*

*(3) या विभागातील 3 ते 42 प्रश्नांना प्रत्येकी चार पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी योग्य उत्तराचा पर्यायक्रमांक उत्तरपत्रिकेत लिहा.*

*(4) शक्यतो खाडाखोड करू नये.*

*(5) उत्तराची दुरुस्ती करताना चौकोनातील उत्तरक्रमांकावर 3 अशा प्रकारे तीन आडव्या रेषा माराव्या व बदललेल्या उत्तराचा पर्यायक्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूस लिहावा. जसे 3 2.*

*(6) उत्तराची दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी फक्त एकदाच मान्य होईल.*

*(7) पाच पेक्षा जास्त दुरुस्त उत्तरे नोंदविल्यास अशा जादा दुरुस्त्यांना गुण दिले जाणार नाहीत.*

**प्र. 3. ते 7. → खाली दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा. त्याखाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्यायाची निवड करून त्याचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

धबधब्याजवळ पोचल्यावर आम्हाला काय करावं आणि काय नाही, तेच समजेना इतका आनंद झाला होता. कोणी पाणी उडवायला लागला, कोणी पाण्यात पळायला लागला. रोहन पाण्यातच बसून राहिला. त्यानं शर्ट काढून टाकला होता. शंतनू रंगीत दगड गोळा करीत होता. मुली फुलं गोळा करीत होत्या. कोट-टोपी काढलेल्या सरांनी धोतराचा काचा मारला होता. ते धबधब्यांच्या रांगेत उभे राहून हसत होते. त्यांच्या डोक्यावरचे काळे कुरळे केस आम्ही पहिल्यांदाच पाहिले. कोट-टोपी काढलेले, हसणारे

मास्तर आम्हांला आमच्यासारखेच वाटायला लागले. जोरात पाऊस आला तरीसुद्धा ते देवळाकडे पळाले नाहीत. आमच्याबरोबर भिजत उभे राहिले. मग आमच्या बाईही धबधब्यांच्या रांगेत येऊन उभ्या राहिल्या; आणि त्याही हसायला लागल्या. सगळीकडं हिरवंगार होतं आणि सगळीकडं भरून राहिलेला वासही हिरव्याच रंगाचा असावा, असं वाटत होतं.

पायाखालून आणि वरून वाहणारं पाणी गुदगुल्या करून पुढं जात होतं. इकडंतिकडं पळणारी मुलंमुली हळूहळू त्या धबधब्यांच्या समोरच आली. आपोआपच आमची एक साखळी तयार झाली. लोखंडी साखळीसारखी नाही, तर रंगीबेरंगी, वेगळ्या वेगळ्या हसणाऱ्या बोलणाऱ्या आवाजांची साखळी. आम्ही वेगवेगळी मुलं नव्हतोच, तर आम्ही सगळी एकच आहोत असं मॅडसारखं वाटत होतं. वाहणाऱ्या पाण्याच्या विरूद्ध दिशेनं एकमेकाच्या हातात हात घालून आम्ही कुठंतरी निघालो आहोत असं वाटत होतं. मधेच मॅडसारखं पिवळंधमक ऊन पडलं आणि कुठंकुठं भरून राहिलेलं पाणी अंगठीतल्या खड्यासारखं चमकायला लागलं.

3. वरील उताऱ्यात कशाचे वर्णन आले आहे ?

(1) मैदानावर खेळण्याचे (2) धबधब्यातील आनंद लुटण्याचे

(3) हिरव्यागार रानाचे (4) मुलांच्या अभ्यासाचे

4. मुलांना सर त्यांच्यासारखे का वाटायला लागले ?

(1) सर मुलासमवेत खेळ खेळत होते म्हणून

(2) सर पाण्यात पळत होते म्हणून

(3) कोट-टोपी काढलेले सर हसणारे होते म्हणून

(4) सर देवळात उभे होते म्हणून

5. धबधब्यात उभ्या असणाऱ्या मुलांना काय वाटत होते ?

(1) आम्हाला फुलं गोळा करायला मिळाली

(2) आम्हाला हिरवा निसर्ग पहायला मिळाला

(3) आम्हाला गुदगुल्या करणारं पाणी पहायला मिळालं

(4) आम्ही सगळे एकच आहोत

6. धबधब्याजवळ पोचल्यावर मुलांनी आपला आनंद कसा व्यक्त केला ?

(1) पाणी उडवून, पाण्यात पळत जाऊन

(2) रंगीत दगड गोळा करून

(3) पाण्यातच बसून राहून

(4) आजूबाजूची फुलं गोळा करून

7. पाणी अंगठीतल्या खड्यासारखं चमकायला लागलं कारण :

(1) पाणी हिरवगार होतं

(2) पिवळधमक ऊन पडलं होतं

(3) पाण्याजवळ देऊळ होतं

(4) मुलांनी साखळी तयार केली होती

**प्र. 8. ते 12. → खालील कविता वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोधा व त्यांचे पर्यायक्रमांक लिहा.**

सूर्य थकला जलधीत उडी घाली
सांज खुलली पसरली पुसट लाली;
अंधकाराचे फडकले निशाण
निशा चढली दशदिशा करी म्लान ॥

वनी गेल्या ज्या चराया दुपारी
धेनु, येउनि थबकल्या बंद दारी;
धीर न निघे, उकरति खुरे माती
कवाडाने ढकलून आंत जाती ॥

भेटती त्या हुंगिती वासरांना
सुतस्पर्शे जननीस फुटे पान्हा;
धेनु अंगा चाटिती स्ववत्साचे
वत्स पीती जे स्तनी दुग्धसाचे ॥

वरी आंथरिला पिसांचा बिछाना
अधर झोपविले त्यावरी पिलांना;
उडत पक्षी भक्ष्यार्थ वनी गेले.
पिलांपाशी सांजेस उभे ठेले ॥

8. कवितेत वर्णन केलेली वेळ कोणती ?

(1) सकाळ (2) दुपार

(3) संध्याकाळ (4) रात्र

9. कवितेतील गायी वनात केव्हा गेल्या ?

(1) सकाळी (2) दुपारी

(3) संध्याकाळी (4) सूर्योदयापूर्वी

10. गायी खुरांनी माती उकरतात, कारण..........

(1) त्यांना वासरांना भेटण्याची घाई झालेली असते.

(2) मालक दूध काढण्याची घाई करतात.

(3) वासरे त्यांना हुंगण्यास अधीर झालेली असतात.

(4) गोठ्याची कवाडे सताड उघडी असतात.

11. पक्षी वनात कशासाठी गेले होते ?

(1) पिलांना उडणे शिकविण्यासाठी

(2) पिलांचा बिछाना बनविण्यासाठी

(3) भक्ष्य शोधण्यासाठी

(4) पिलांना झोपविण्यासाठी

12. 'दशदिशा म्लान झाली' म्हणजे नेमके काय झाले ?

(1) सांज खुलली (2) रात्र झाली

(3) निशाण फडकले (4) माध्यान्ह झाली

**प्र. 13. ते 17. → खालील संवाद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तराचे पर्यायक्रमांक चौकटीत लिहा.**

"बाप रे, केवढे हे पाणी !" वसंत

"हो ना, सगळीकडे नुसते पाणीच पाणी झाले आहे." वर्षा

"नदीला किती फुगवटा आला आहे नाही !" शरद

"बाबा म्हणत होते, पाणी असेच वाढू लागले तर सगळ्यांनाच गाव सोडावे लागणार दोन दिवसात." हेमंत

"अरे, ग्रीष्मा तर, पुराच्या भीतीने आईबरोबर तिच्या आजोळी गेलीसुद्धा." वर्षा.

"शिशिर, मला पूजेसाठी पाणी मिळेल ना ?" ग्रीष्माची आई.

"ए शिशिरमामा, पाणी कुठं आहे नळाला ?"

"अगं, इथे टँकरने पाणी येत. तेही चार दिवसातून एकदा."

"अरे, माझ्या लेकीला तर अंघोळीला भरपूर पाणी लागते."

"ताई, इथल्या लोकांना रोजच पाण्यासाठी वणवण करावी लागते."

"म्हणजे इथे आम्हाला पाणी-पाणी करावे लागणार तर ?"

13. वरील दोन्ही संवादामध्ये एकूण किती व्यक्तींनी भाग घेतला आहे ?

(1) सात (2) आठ

(3) नऊ (4) दहा

14. संवादातील लोकांना गांव सोडावे लागण्याची परिस्थिती का निर्माण झाली होती ?

(1) साथीच्या रोगांमुळे (2) दंगलीमुळे

(3) महापुरामुळे (4) दुष्काळामुळे

15. संवादातील ग्रीष्माचा मामा कोण ?

(1) वसंत (2) शरद

(3) हेमंत (4) शिशिर

16. संवादातील कोणत्या व्यक्तीला अंघोळीसाठी भरपूर पाणी लागते ?

(1) ग्रीष्माची आई (2) ग्रीष्मा

(3) वर्षा (4) शिशिर

17. 'पाणी-पाणी करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ कोणता ?

(1) पाणी वाढत जाणे

(2) पाण्याची पूजा करणे

(3) पाण्याची उणीव भासणे

(4) पाण्याची सुबत्ता येणे

**प्र. 18. ते 22. → खाली एका सुसंगत परिच्छेदाची पाच वाक्ये दिली आहेत. योग्य पर्याय निवडून परिच्छेदाची वाक्ये पूर्ण करण्यासाठी योग्य शब्दाचा पर्यायक्रमांक लिहा.**

18. ..................चे दिवस होते.

(1) गौरी गणपती (2) दिवाळी

(3) वसंतऋतू (4) दसरा

19. लोकांची..................धांदल उडाली होतो.

(1) फराळ तयार करण्यासाठी (2) गणेश विसर्जनासाठी

(3) आंबे काढण्यासाठी (4) सोने लुटण्यासाठी

20. सर्वत्र..............ढीग साचलेले होते.

(1) दुर्वा व फुलांचे (2) कागदी बश्यांचे

(3) आंब्याच्या सालींचे (4) शमीच्या पानांचे

21. लोक विविध ठिकाणच्या जलाशयात............विसर्जन करत होते.

(1) गणेशमूर्ती व निर्माल्याचे (2) रावणाच्या प्रतिमेचे

(3) शमीवृक्षांचे (4) आंब्याच्या सालींचे

22. '..................रोखण्यासाठी घराच्या परसात वा बागेत गणेश व निर्माल्याचे विसर्जन करावे', असे आवाहन पर्यावरण प्रेमींनी केले.

(1) वायूप्रदूषण (2) ध्वनीप्रदूषण

(3) जलप्रदूषण (4) भूमीप्रदूषण

23. खालील शब्दाचे सामान्यरूप कोणते ?

**'शाहीर + ने'**—

(1) शाहिरा (2) शाहीरा

(3) शाहीरांनी (4) शाहीराने

24. खाली दिलेल्या वाक्यातील सर्वनामाचा प्रकार ओळखा व त्याचा योग्य पर्यायक्रमांक लिहा.

'ही मुलगी चलाख आहे.'

(1) संबंधी सर्वनाम (2) दर्शक सर्वनाम

(3) सार्वनामिक सर्वनाम (4) प्रश्नार्थक सर्वनाम

25. प्रयोजक क्रियापदाचे अचूक उदाहरण कोणते ते ओळखून त्याचा योग्य पर्यायक्रमांक लिहा—

(1) विदूषक प्रेक्षकांना हसवतो

(2) विदूषक करामती करतो

(3) विदूषक प्रेक्षकांना हाकलतो

(4) विदूषक हसत हसत रडतो

26. खालीलपैकी कालवाचक क्रियाविशेषण अव्यय असणारे वाक्य ओळखा.

(1) बल्लू आमच्याकडे अधून मधून येतच राहिला

(2) वाऱ्याखाली कसेबसे
उभे रोप जवारीचे

(3) त्या दिवशी मला कृष्णेचे दर्शन प्रथम घडले

(4) वारा सर्वत्र वाहत असतो

27. 'आगंतुक' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) अभिवादन (2) अनपेक्षित

(3) आमंत्रित (4) सहेतुक

28. 'गाडगे महाराज खापरातून पाणी प्यायचे' —या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) सकर्मक कर्तरी (2) अकर्मक कर्तरी

(3) कर्मणी (4) सकर्मक भावे

29. 'चांदणे' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता ?

(1) कौमुदी (2) तारका

(3) जोत्स्ना (4) चंद्रिका

30. 'षण्मास' या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता ?

(1) षण् + मास (2) षन् + मास

(3) षड् + मास (4) षट् + मास

31. 'आधुनिक विचारांचा दृष्टीकोन असणारा' या शब्दसमूहाबद्दल एक शब्द ओळखून लिहा.

(1) पुरोगामी (2) प्रतिगामी

(3) अधोगामी (4) उर्ध्वगामी

32. खालीलपैकी शुद्ध शब्द कोणता ?

(1) कनिष्ट (2) कनीष्ठ

(3) कनिषठ (4) कनिष्ठ

33. <u>'तडीसनेणे'</u> या अर्थावरून तयार होणारा वाक्प्रचार ओळखा.

(1) फुशारक्या मारणे (2) फत्ते करणे

(3) खूणगाठ बांधणे (4) गगन ठेंगणे होणे

34. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची कारकविभक्ती ओळखा.

'<u>शितू</u> भयाने मागे सरली.'

(1) प्रथमा (2) द्‌वितीया

(3) तृतीया (4) चतुर्थी

35. भारतीय संस्कृती-कोशाचे संपादक कोण ?

(1) पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी (2) पंडित विष्णूशास्त्री जोशी

(3) पंडित बाळशास्त्री जोशी (4) पंडित महादेवशास्त्री जोशी

36. 'मला माझ्या आयुष्याची फिकीर नाही.' या वाक्यातील काळ ओळखा.

(1) भूतकाळ (2) भविष्यकाळ

(3) वर्तमानकाळ (4) अपूर्णभूतकाळ

37. खाली कंसात दिलेल्या अक्षरांपासून एक म्हण बनवा. तिचा अर्थ खालीलपैकी कोणता त्याचा पर्यायक्रमांक लिहा.

(लाथळा, पाउळ, फाखण्या टळखर)

(1) उचलली जीभ लावली टाळ्याला

(2) उथळ पाण्याला खळखळाट फार

(3) आपल्या अंगी असलेल्या कमी गुणांचा खूप गवगवा करणे

(4) एखाद्या गोष्टीचा विचार न करता उगाचच त्याविषयी बोलत राहणे

38. खाली दिलेल्या वाक्याचे आज्ञार्थी वाक्य तयार करा.

'तुम्ही सर्वांनी वृक्षसंवर्धन करावे.'

(1) त्यानी वृक्षसंवर्धन करावे

(2) त्या सर्वांचे वृक्षसंवर्धन करून झाले

(3) तुम्ही सर्व वृक्षसंवर्धन करा.

(4) सर्वजण वृक्षसंवर्धन करतात

39. खालील वाक्यात असणाऱ्या विभक्तींची संख्या सांगा.

'मी घाईने गोठ्यातून बाहेर आलो.'

(1) एक (2) दोन

(3) चार (4) पाच

40. खालीलपैकी अलंकारिक नसलेला शब्द कोणता ?

(1) वामनावतार (2) लंकेची पार्वती

(3) गर्भश्रीमंत (4) उदार

41. खालील वाक्यातील कंसात कोणत्या विरामचिन्हाची आवश्यकता आहे ?

मी कशाचा आनंद म्हणालो ( ) ज्ञानाचा आनंद नाही का ( ) थोडासा जड वाटला ना शब्दप्रयोग ( ) तसा तो जड नाही

(1) अवतरण चिन्ह (2) अपसारण चिन्ह

(3) प्रश्नचिन्ह (4) स्वल्पविराम

42. खाली दिलेल्या शब्दात किती व्यंजने आहेत ते सांगा.

'<u>लक्ष्मीनारायण</u>'

(1) सहा (2) सात

(3) आठ (4) नऊ